**महाराष्ट्र विधानसभा**

**दुसरे अधिवेशन, २०२५**

**सन २०२५-२६ च्या पुरवणी मागण्यांवरील**

**माननीय अध्यक्षांनी मान्य केलेल्या कपात सूचनांची यादी**

**बुधवार, दिनांक ९ जुलै, २०२५**

**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**

**कपात सूचनांची एकूण संख्या – २**

| अ.क्र. | कपात सूचना क्र. | कपात रूपये | सदस्यांचे नाव व विषय |
|---|---|---|---|
| | | | **पूरक मागणी क्रमांक: यू-४**<br>**मुख्य लेखाशीर्ष: ३४३५, पारिस्थितिकी व पर्यावरण**<br>**बाब क्रमांक: २८३, रूपये:- ७०,००,००,०००/-**<br>**श्री. संजय मेश्राम** |
| (१) | ६७९ | १० | उमरेड (जि.नागपूर) येथील गंगापूर, कावरापेठ, बुधवारी पेठ व अन्य परिसरात कोलयार्ड उभारणीचे काम सुरु असल्याचे माहे जून,२०२५ च्या पहिल्या आठवडयात निदर्शनास आले, कोलयार्डमुळे शेती, पाणी, हवामान प्रदूषित होऊन येथील नागरीकांचे आरोग्य धोक्यात येणार आहे, , त्यामुळे या कोलयार्डला विरोध होत असून येथील नागरीक आंदोलने करीत आहेत, याबाबत शासनाने माहिती घेऊन सदर कोलयार्ड हटविण्याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना. |
| | | | **श्री. विजय वडेट्टीवार** |
| (२) | ८३१ | १० | वर्धा नदी चंद्रपूर आणि यवतमाळ जिल्ह्यांच्या सीमेजवळ घुग्घुस (चंद्रपूर जिल्ह्यात) येथे स्थित असून २०२३, २०२४ आणि २०२५ साठी वर्धा नदीमध्ये कोळसा वाहतुकीसाठी मोठ्या वाहनांसाठी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडला मातीचा पूल बांधण्याची परवानगी जलसंपदा विभागाने देणे,सार्वजनिक बांधकाम विभागाची मान्यता घेणे बंधनकारक असूनही, वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने ती घेतली नसणे, वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने जलसंपदा विभागाच्या अटी आणि शर्तींनुसार पुलाचा दर्जा सुनिश्चित केला नसल्यामुळे मातीचा पूल पाण्यामुळे वाहून जाणे आणि त्यासोबत पाइप्स, दगड, सिमेंट काँक्रीट वगैरे वाहून जाऊन नदी प्रदूषित होणे, घुग्घुस आणि नागपूर येथील नागरिकांनी वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडच्या अधिकाऱ्यांविरुद्ध कार्यवाहीसाठी जलसंपदा विभागाकडे तक्रारी केल्या असणे, तसेच वेस्टर्न कोलफिल्ड्स लिमिटेडने चंद्रपूर जिल्ह्यातील इराई आणि जरपट नद्यांच्या प्रदूषणास प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याकडे दुर्लक्ष करणे, याबाबत शासनाने करावयची कार्यवाही व उपाययोजना" |

---

**विधान भवन**
**मुंबई,**
**दिनांक : ९ जुलै, २०२५**

**जितेंद्र भोळे,**
**सचिव-१,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**याची प्रत :**

(१) मंत्री व राज्यमंत्री
(२) विधानसभेचे सर्व सदस्य.
(३) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग
(४) संसदीय कार्य विभाग.
(५) वित्त विभाग.